लोकसंख्येच्या तसेच डोंगरी क्षेत्र निकषानुसार आरोग्य संस्थांना मंजूरी देण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
सार्वजनिक आरोग्य विभाग,
शासन निर्णय क्र.पीएचसी-१०९४/४१४/४१९९/प्र.क्र.१३/९५/आ.४,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक- १ जानेवारी,१९९६.

निर्णय:- किमान गरजा कार्यक्रमांतर्गत सार्वजनिक आरोग्य विभागामार्फत राज्यात उपकेंद्रे, प्राथमिक आरोग्य केंद्रे व ग्रामीण रुग्णालये या सारख्या आरोग्य संस्था लोकसंख्येच्या निकषावर मंजूर करण्यात येतात. या संस्था मंजूर करण्यासाठी केंद्र शासनाने मंजूर केलेले लोकसंख्येचे निकष खालीलप्रमाणे आहेत:-

| अ.क्र. | संस्थेचा प्रकार | लोकसंख्या | |
|---|---|---|---|
| | | बिगर आदिवासी क्षेत्र | आदिवासी क्षेत्र |
| १. | उपकेंद्र | ५,००० | ३,००० |
| २. | प्राथमिक आरोग्य केंद्र | ३०,००० | २०,००० |
| ३. | ग्रामीण रुग्णालय [कम्युनिटी हेल्थ सेंटर]. | प्रत्येक चार प्राथमिक आरोग्य केंद्रामागे एक | |

२. उपकेंद्रे व प्राथमिक आरोग्य केंद्रे यांच्या बाबतीत केंद्र शासनाचे निकष राज्य शासनाने स्वीकारलेले आहेत. तथापि ग्रामीण रुग्णालयांच्या बाबतीत वरील निकषात थोडा बदल करुन महाराष्ट्र शासनाने दर पांच प्राथमिक आरोग्य केंद्रामागे एक ग्रामीण रुग्णालय मंजूर करण्याचा निकष ठरविलेला आहे.

३. राज्यातील भौगोलिक परिस्थितीचा विचार करता त्यात डोंगराळ क्षेत्राचे प्रमाण फार आहे. व या क्षेत्रात लोकसंख्या पाडयापाडयात विखुरलेली असल्याने व पाडयापाडयातील अंतर जास्त असल्याने वर नमूद केलेल्या लोकसंख्येच्या प्रमाणित डोंगरी क्षेत्रात प्राथमिक आरोग्य केंद्रे एकमेकांपासून फार अंतरावर मंजूर केली जातात व त्यामुळे डोंगरी क्षेत्रात जनतेला आवश्यक तेवढया प्रमाणात आरोग्य सेवा मिळू शकत नाही. म्हणून डोंगरी क्षेत्रात लोकसंख्येच्या निकषात बदल करण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता. त्यावर शासनाने आता असा निर्णय घेतला आहे की, डोंगरी क्षेत्रात उपकेंद्रे किंवा प्राथमिक आरोग्य केंद्रे मंजूर करतांना ती आदिवासी

जिल्हाधि...
09 JAN 1996

[कृ.मा.प.]

क्षेत्रातील लोकसंख्येच्या निकषानुसार मंजूर करण्यांत यावीत.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

[ज.मा.प्रधान]
महाराष्ट्र शासनाचे अवर सचिव.

प्रति,

संचालक, आरोग्य सेवा, मुंबई.

महालेखापाल [लेखा परीक्षा/लेखा अनुज्ञेयता], मुंबई/नागपूर.

सहसंचालक, आरोग्य सेवा [निविमू], मुंबई.

सहसंचालक, आरोग्य सेवा [आरोग्य], पुणे.

अतिरिक्त संचालक, आरोग्य सेवा, [कु.क., माता बाल संगोपन व शालेय आरोग्य, पुणे.

उपसंचालक, आरोग्य सेवा, प्रभारी सर्व विभागीय मंडळे.

सर्व जिल्हा शल्य चिकित्सक.

सर्व जिल्हा आरोग्य अधिकारी.

सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी.

सर्व जिल्हा अधिकारी व सदस्य सचिव, जिल्हा नियोजन व विकास मंडळ.

नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई.

वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई.

आदिवासी विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.

ग्राम विकास व जलसंधारण विभाग, मंत्रालय, मुंबई.

अर्थसंकल्प कार्यासन आ.८ कार्यासन, सा.आ.वि. मंत्रालय, मुंबई.

आस्थापना कार्यासन [३ प्रती].

निवड नस्ती कार्यासने आ.४